# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक 20/01/2016 (का.प.क्र.12) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>**

बुधवार दिनांक 20 जानेवारी-2016 (का.प.क्र .12) रोजी मा.सभापती श्री. थोरात दिलीप गंगाधर यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 12.15 वा.वंदेमातरम् या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.रमेश पवार, नगरसचिव श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.गजानन रामकिशन बारवाल
02. स.स.श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले
03. स.स.श्री.नितीन रमन चित्ते
04. स.स.श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
05. स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप
06. स.स.श्री.गजानन भानुदास मनगटे
07. स.स.श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
08. स.स.श्री.विकास प्रकाश एडके
09. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
10. स.स.श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर
11. स.स.श्री.खान इरशाद इब्राहीम
12. स.स.श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
13. स.स.श्रीमती ज्योती राजाराम मोरे
14. स.स.श्रीमती रेश्मा अशफाक कुरैशी

श्री.गजानन बारवाल :श्री.अरुण टिळेकर,श्री.दौलतराव आहेर,आरोग्य मंत्री,श्री.मंगेश पाडगावकर तसेच पठाणकोट हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्री.अब्दुल नाईकवाडी : अनुमोदन देण्यात येते.

मा.सभापती : श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.

श्री.चित्ते नितीन :श्री.रावसाहेब दानवे यांची प्रदेशाध्यक्षपदी निवड झाली. त्यांच्यामुळे बराच निधी शहराला मिळालेला आहे. तसेच श्री.किशनचंद तनवाणी यांचा शहर अध्यक्ष म्हणुन निवड झाली आहे. त्यांच्या दोघांच्या अभिनंदनाच्या ठराव मंजुर करावा.

श्री.गजानन बारवाल :रूपये 15700 कोटी मिळालेले आहे. सभागृहात चांगल्या रितीने प्रश्न मांडलेले आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येते.

मा.सभापती :श्री. नितीन चित्ते व श्री.गजानन बारवाल यांनी सुचविल्याप्रमाणे, श्री.रावसाहेब दानवे यांची भाजपा प्रदेशाध्यक्ष व श्री.किशनचंद तणवानी यांचे भाजपा शहराध्यक्षपदी तसेच श्री.अंबादास दानवे यांची शिवसेना जिल्हाप्रमुख म्हणुन निवड झाली आहे. त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मंजुर करण्यात येतो.

श्री.गजानन मनगटे :सभा तहकूब करण्यात यावी. गेल्या 8-10 महिन्यांपासून वॉर्डात एकही विकास काम झालेले नाही.

श्री.नाईकवाडी अ.रहिम :एका कामासाठी नगरसेवक 8 महिन्यापासुन चकरा मारतो तर सामान्य नागरिकांचे काय हाल असतील अधिकारी उपस्थित असणे आवश्यक असतांना अधिकारी

तपासणी करायले गेले. एक महिन्यानंतर बैठक आयोजित करण्यात येत आहे. ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी मा.आयुक्त मा.सर्वसाधारण सभा, स्थायी समिती सभे मध्ये वारंवार सांगीतले आहे. परंतु त्याचा काही उपयोग नाही.

श्री.मनगटे गजानन :स्मशानभुमीत पायऱ्या नीट नाहीत राजीनामा देण्यास तयार आहे. कामे होत नाहीत. सभा बरखास्त करावी. सभा घेऊन उपयोग नाही.

श्री.नाईकवाडी अ.रहिम :टिम नाही असे म्हणतात. आयुक्तांचे आदेशाचे पालन होत नाही.

श्री.मकरंद कलकर्णी :वर्षात एक काम होत नसेल तर काय उपयोग? मला फक्त पाच ढापे पाहिजेत तेही काम होत नाही. बजरंग चौक ते बळीराम पाटील येथे चेंबर बनवण्याचे काम होत नाही.

मा.सभापती :सर्वांना बोलण्याची संधी देतो शांततेने आपल्या भावना व्यक्त कराव्यात. सर्वांचे म्हणणे एकुण घेतलेल्या मा.आयुक्त आपण या सर्व बाबीमध्ये लक्ष घालावे.

श्री.एडके विकास :गेल्या 8 महिन्यापासुन पाठपुरावा करत आहे. नुर कॉलनी नाला येथे दोन व्यक्ती दगावले आहे. लोकांच्या घरात पाणी आहे. आजार दुर्गंधी पसरली आहे.

श्री.आमले रावसाहेब :सभापती श्री.सुभाष शेजवळ यांना श्री.सिकंदर आली यांनी बाहेर थांबवले. श्री.सिकंदर अली यांना बाहेर पाठवा असे माझे वैयक्तीक मत आहे. नसता सभा पुढे सुरु होऊ देणार नाही.

मा.सभापती :हे योग्य नाही. अधिकाऱ्यांनी सदस्यांना योग्य वागणुक देण्यात यावे. श्री.सिकंदर अली आपण या बाबतीत खुलासा करावा.

श्री.सिकंदर अली :माझ्याकडे दालनात 3 स.नगर सेवक अगोदरच बसले होते. शेजवळ यांच्या सोबत 4/5 लोक आले होते. स.सदस्य यांना बसायला सांगितले व त्यांच्या सोबत आलेल्या लोकांना बाहेर थांबविण्यात सांगितले. नंतर ते महापौरांकडे गेले नंतर ते आयुक्तांकडे गेले. 22 तारखेला मिटींग झाली.

श्री.रावसाहेब आमले :स.सदस्यांना अपमानित केले आहे.

मा.सभापती :हि बाब आक्षेपार्ह आहे. योग्य ती वागणुक द्यावी. सदस्यांच्या भावना तिव्र आहेत.

श्री.सिकंदर अली :या बाबतीत मी दिलगीरी व्यक्त केली आहे. पुन्हा दिलगीरी व्यक्त करतो.

मा.सभापती :या पुढे असे घडणार नाही. मी आयुक्तांना तशी सुचना देतो.

श्री.अब्दुल नाईकवाडी :गेल्या 8 महिन्यापासून ड्रेनेजचे काम झालेले नाही.
(सर्व स.सदस्य A1, B1 रेट लिस्ट का बंद केल्या म्हणून एकाच वेळी बोलतात.)

श्री.कुलकर्णी मकरंद :वॉर्डात कुठलेही कामे होत नाहीत.

मा.सभापती :अफसर सिद्दीकी काय विषय आहे? (नाईकवाडी यांच्या बाबतीत)

श्री.अफसर सिद्दीकी(EE):नाईवाडी यांचे काम मनपा फंडातुन करुन घेण्याच्या आयुक्तांच्या सुचना आहेत. संचिका प्रोसेस मध्ये आहे.

श्री.अब्दुल नाईकवाडी : आता संचिका कुठे आहे.

मा.सभापती :शहर अभियंता खुलासा करतील. या बाबतीत जो प्रश्न उपस्थित झाला आहे. ड्रेनेजची समस्य आहे. हा विशिष्ट प्रकारचा मुद्दा आहे. आरोग्याचा प्रश्न आहे. जे काम करणे आवश्यक आहे.

श्री.पानझडे (शहर अभियंता):नाईकवाडी मला सुध्दा बोलले लोकांच्या आरोग्याच्या प्रश्न आहे. युआयडीसी मधुन 110 कोटी कपात केले आहे. UIID मधून हे काम होऊ शकत नाही. एस.टी.पी. मेन ब्रान्च लाव्ह आणि सेव्हर लाईन हँण्ड टु हँण्ड 1 ते 2 दिवसात टेंडर ला पाठवु. निविदा काढुन काम करण्यात येईल.

| | |
|---|---|
| श्री.अब्दुल नाईकवाडी | :2 ढापे साठी 6 महिने लागतात. कित्येक तास अधिकाऱ्यांची वाट पाहावी लागते. आज-उद्या करता करता गेले 7 महिने झाले आहे, परंतु काम झाले नाही. |
| श्री.जगताप कमलाकर | :माझा वॉर्ड जालना रोडटच आहे. ड्रेनेज चे काम जालना रोड टच असुन ही ड्रेनेज वाहत आहे. माझी 15 लाखाची फाइले परत आली. |
| मा.सभापती | :निवडणूक आल्यापासुन कोणाच्याच वॉर्डात कामे झाले नाहीत. सर्वांच्या भावना मी समजतो. आज सर्वांना एकच Common विषय आहे. शहर अभियंता यांना मत मांडुन आदेश देवु. |
| श्री.आमले रावसाहेब | :वसुली करु शकत नसतील तर पगार कशाला देता? |
| श्री.मनगटे गजानन | :दोन चेंबर रोज फुटतात. न्यायनगर हुसेन कॉलनी रेट लिस्ट / ए-1 का बंद केले याचा खुलासा व्हावा. भ्रष्टाच्या नेमका कुठे होतो याचा खुलासा व्हावा. |
| श्री.मेघावाले मोहन | :A1 Rate list बाबत प्रश्न उपस्थित केला आहे. श्रीमती नरोटे ह्या सभा गृहातुन निघुन गेल्यानंतर मा.आयुक्त यांनी तातडीने दुसऱ्या दिवशी बैठक आयोजित केली. त्यावेळी सांगण्यात आले की, सर्वांच्या वॉर्डात थोड्या फार प्रमाणात विकास कामे करण्यात येईल. सदस्यांचे बोलने बरोबर आहे. एकही काम होत नाही. ठेकेदार काम करत नाही. आयुक्त बोलले ठेकेदारांना थोडे थोडे पैसे देतो?<br>ज्या जनतेने आमच्यावर विश्वास टाकला त्यांचे काम होत नसेल तर वॉर्डातील जनता एक दिवस रस्त्यावर येतील व चित्र वेगळे राहील श्री.सिकंदर अली यांनी सदस्यांच्या अपमान करायच्या नव्हता. स.सदस्यांना मानसन्मान देणे आवश्यक आहे. स्वेच्छा निधी बाबत निर्णय घेण्यात यावा. अत्यावश्यक कामांना प्राधान्य देवून करण्यात यावे. |
| मा.सभापती | :श्री.सिकंदर अली यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे. |
| श्री.मनगटे गजानन | :माझ्या वॉर्डात मजुर साफसफाई करीता येत नाही. ड्रेनेजची समस्या आहे. |
| श्री.चित्ते नितीन | :आदेश लेखी असला पाहिजे. अधिकारी यांना अडचण आहे. काम आम्ही कसे करणार? तोंडी आदेशानुसार काम करता येत नाही. अडचण येतात. लेखी आदेश देण्यात यावा. ड्रेनेज चोकअप बाबत मा.आयुक्त यांचेशी चर्चा करण्यात आली. 10 लाखाची ढापे बाबत चर्चा केली आहे. लेखी आदेश नाहीत. रेट लिस्ट, ए-1 बंद न करता या बाबतची पॉलिसी करुन अत्यावश्यक असेल तिथेच कामे करण्यात यावी.<br>CE/Dy.Eng. यांना काहीच अधिकार नाही. मनपा फक्त कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी आहे का? वसुलीचे कर्मचारी चांगली कामे करतात आज वसुली वाढली आहे. ज्या ज्या वॉर्ड मध्ये वसुली चांगली तेथे कामे व्हावीत. |
| मा.सभापती | :मुख्यलेखाधिकारी, श्री.थोरात यांना सभागृहात बोलविण्यात यावे. |
| श्री.चित्ते नितीन | :पोल लावायचे स्वेच्छानिधी च्या अधिकार ठेवा? स्वेच्छानिधीच्या कामा संबंधी ठेकेदार निट काम करतो का नाही. हे प्रशासनाचे/अधिकाऱ्यांचे पाहण्याचे काम आहे. स्वेच्छानिधी बाबत आमच्या अधिकारावर गदा आणु नये. ही बाब सभापती यांनी आयुक्त यांचे निदर्शनास आणुन घ्यावी. |
| श्री.मेघावाले मोहन | :वॉर्ड-ब ची वसुली खुप वाढलेली आहे. स्वेच्छानिधीचे नेहमी प्रमाणे कामे व्हायला पाहिजे. |
| श्री.मनगटे गजानन | :ड्रेनेजलाईन साठी वॉर्डात 50 हजाराचे काम झाले आहे. दोन ए-1 मध्ये काम करण्यात आले. |
| मा.सभापती | :आज मी सर्वांचे बोलणे ऐकुण घेण्यात येत आहे. शेवटी मी माझा निर्णय देईल. |

| | |
|---|---|
| श्री.बारवाल गजानन | :मा.आयुक्तांची 10 लाखाची कामे करु असे आश्वासन दिले. परंतु एकही काम झाले नाही. आज आयुक्त सांगतात तेवढीच कामे होतात. नगरसेवकांची काही जबाबदारी राहिली नाही. मा.पालकमंत्री यांचे अभिनंदन करावे. कचरा मुक्त शहर त्यांनी प्रयत्न केले. प्लॅस्टिक, पोस्टर ई.बंद केलेले आहे. आज समांतरचे कौतूक करण्यात येते. त्यांनी नागरीकांचे तक्रारी सोडवलेल्या आहे. |
| मा.सभापती | :आपण A-1 Rate list स्वेच्छानिधी सविस्तर खुलासा व त्यावर काय पर्याय मार्ग सुचावा नसता आम्ही स्थायी समिती काहीतरी निर्णय घेई. |
| शहर अभियंता | : A-1 Rate list बाबत वित्तीय शिस्त पाळण्यासाठी निर्णय घेतलेला आहे. अत्यावश्यक कामे करण्यासाठी वॉर्ड मध्ये 5 लाखाची तरतुद ठेवली आहे. स्वेच्छा निधी बाबत कामाची यादी सोबत जोडण्यात आली आहे. त्यापैकी कामे करणे आवश्यक आहे. 112 वॉर्डातील कामासाठी टेंडर काढले आहे. 40 वॉर्डाच्या निविदा काढलेल्या आहेत. A-1 Rate list करण्याचा उद्देश सफल होत नाही. |
| मा.सभापती | :काम वाढले तर वेगळे टेंडर काढावे लागेल काय? आर्थिक शिस्त लागेल. त्याच्या अंमलबजावणीची आता वेळ झाली आहे. |
| श्री.मनगटे गजानन | :आमच्या खिशातुन कामे करुन घेण्यात येईल. 5 लाखाचे टेंडरचे काम थांबविण्यात आले असे अधिकाऱ्याने सांगितले आहे. |
| शहर अभियंता | :असे बोलत असेल तर ते अत्यंत बेजबाबदार आहे. काम कुठेही थांबवण्यात आले नाही अशा कर्मचात्याचे नांव घ्या कार्यवाही करण्यात येईल. |
| श्री.कुलकर्णी मकरंद | :गुलाब मंगल कार्यालय समोर ड्रेनेज फुटले आहे. महिने झाले आहे. काम होत नाही. मागील 5 वर्षाच्या फाईल काढुन त्यांनी स्वेच्छानिधीचा गैरवापर त्यांच्या जो करतो गुन्हे दाखल करा. |
| मा.सभापती | :सर्वांच्या भावना सभागृहासमोर, पत्रकारांसमोर आल्या आहेत. आपण निश्चितच चांगल्या निर्णय घेवु. |
| श्री.एडके विकास | :1988 पासुन हे चालले आहे ए-1 रेट लिस्ट बाबतीत प्रत्येक वर्षी त्या त्या वेळेस त्या त्या अधिकाऱ्यांनी काम का केले नाही? पॉलीसी बदला आयुक्तांना ए-1/रेट लिस्ट हे नाव बदलुन नामांतर करा व Revision करा स्वेच्छानिधीच्या Revision करण्याची आज वेळ आली आहे. सर्व सदस्यांच्या तिव्र भावना लक्षात घेऊन सर्वांनी बोलावे, महादेव मंदिर ते मसलेकर नाल्याचे काम झाले नाही. 25 ते 30 वर्षापासुन खुले रंगमंच पडायला आले आहे. त्याकडे कुणाचे लक्ष नाही. |
| मा.सभापती | : श्री.अफसर सिद्दीकी दोन दिवसांत अहवाल सादर करण्यात यावा. |
| श्री.अफसर सिद्दीकी | :त्वरीत कार्यवाही करण्यात येईल. |
| मा.सभापती | :आयुक्तांना काही बोलायचे त्यांचे मत एकुण घेऊ. |
| मा.आयुक्त | :शहराच्या विकास, भावना व्यक्त केल्या आहेत.<br>1) आयुक्तांनी सर्व अधिकाऱ्यांना सौजन्याची वागणुक द्यावी. याबाबत सर्व विभागांना परिपत्रक काढले आहे. वसुली संदर्भात प्रशासनाने कडक पावले उचलले आहेत. यामध्ये स.सदस्यांनी चांगला प्रतिसाद दिला आहे.<br>2) माझ्या एक वर्षाच्या कार्यकाळात स.सदस्यांनी चांगला प्रतिसाद दिला आहे.<br>3) स.सदस्यांनी कृपया कुठलीही कृत्य करू नये आज पर्यंत सर्वांनी सहकार्य केले. तसेच पुढेही करावे ही विनंती. आज हे शहर 200 कोटी मालमत्ता कराची वसुली झालेली पाहिजे होती. या बाबत आमचे प्रयत्न चालु आहे. |

| | |
|---|---|
| श्रीमती कमल नरोटे | :जनतेला आम्हाला कामे दाखवायची आहेत. |
| मा.सभापती | :मा.आयुक्त, शहर अभियंता यांनी या ठिकाणी आपले मत मांडले आहे. विकास कामे नविन झालेले नाही. मनपाची आर्थिक स्थिती नाजुक असल्याने आर्थिक शिस्त लागणे आवश्यक होते, म्हणून निर्णय घेतलेला आहे.माझ्याकडेही रोज निवेदने येत आहेत. र.रु.25,000,00/- Estimate करुन सदस्यांशी चर्चा करुन Estimate करुन 8 दिवसाचे आत टेंड ला जाईल याची दक्षता घ्यावी. जेणे करुन नागरीकांना दिलासा मिळावा. स्वेच्छानिधी बाबत स.सदस्यांनी सांगीतलेली कामे सुरु करण्यात यावी. स्वेच्छा निधीचा अधिकार अबाधित ठेवण्यात यावा.<br>प्रशासनाच्या घेतलेल्या निर्णयाला आपण आजपर्यंत जे सहकार्य केले असेच पुढेही सहकार्य आपण सर्वजण करु संबंधीत सर्व दिलेल्या आदेशाची त्वरीत तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी. 5 लाखाचे टेंडर होऊन 1 महिना झालेला आहे. 5 लाखाचे टेंडर 70 वॉर्डाचे झालेले आहे. इतर वॉर्डाबाबत (73) वॉर्ड प्रक्रीया करुन अहवाल द्यावा. स.सदस्यांचे काम समाधानकारक होते की नाही? या बाबत खुलासा करावा. फुटकळ 5 लाखाचे कामास मान्यता देण्यात येते. |
| श्री.आमले रावसाहेब | :सरोश स्कुल 2 एकर मध्ये 3 मजली बांधकाम झालेले आहे. वसुली बाबत भेदभाव केला जातो. |
| मा.सभापती | :वसुली बाबत सविस्तर खुलासा करण्यात यावा. |
| श्री.अय्युब खान | :156 कोटीचे टार्गेट आहे. 56 कोटी 26 लाख वसुल झालेलले आहे. सर्व वॉर्डची वसुली 36.06% आहे. मागच्या वर्षापेक्षा यावर्षी आता 12 कोटीने पुढे आहे. वसुली संदर्भात Micro Planning केलेले आहे. सर्व वॉर्ड कार्यालयांना Ward Guardian दिलेले आहे. |
| श्री.आमले रावसाहेब | :सरोश शाळा मिटमिटा येथे कर्मचारी वसुलीसाठी जात नाही. मनपाचे सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची शाळा आहे. |
| मा.सभापती | :शहरात खुप कमी प्रमाणात टॅक्स लागला आहे. |
| श्री.अय्युब खान | :6 वॉर्डात 175 कर्मचारी काम करतात. 156 कोटीचे वसुलीचे टार्गेट आहे. 56 कोटी वसुल झाले आहे. वसुली संबंधी सर्व अधिकारी यांचे आदेश काढण्यात आले आहे. |
| मा.सभापती | :शहरातील ज्या मालमत्ता मोठ्या प्रमाणात वाढलेल्या आहेत. आपल्या कर्मचाऱ्यांकडुन हे टार्गेट पूर्ण होवू शकेल का? नविन टॅक्स लावण्याबाबत काय निर्णय घेतला. मोठे मोठे टॅक्स पेंडींग प्रकरणा बाबतीत काय कार्यवाही केली. |
| श्री.आमले रावसाहेब | :माझ्या वॉर्डात अजून टॅक्स लागलेला नाही. करोडोची वसुली होईल. |
| श्री.चित्ते नितीन | :केंद्रेकर साहेबांचे अभिनंदन. वॉर्ड-ब ची चांगली वसुली होत आहे. 1,97,000/- प्रापर्टी आहेत. 2006 ला सिडको महानगरपालिकेला हॅण्ड ओव्हर झाले आहेत. ज्या दिवशी आपला कर्मचारी वसुलीला जाईल. त्याच दिवसापासुन टॅक्स न लागलेल्या मालमत्तांना टॅक्स लावण्यात यावा. कलेक्टर ऑफीसतर्फे सेतु सुविधा केंद्र चालविण्यात येत आहे. हे अत्यंत चांगले काम करीत आहे. आपल्या नियमावलीला अनुसरून एक सर्व्हिस प्रोव्हाईडर एजन्सी नेमुन चाचणी करण्यात यावी. या नादीत एखाद्या Assessment साठी अशी सेतु सुविधा केंद्रासारखी एजन्सी नेमता येईल का? याची चाचणी करावी त्यावर नियंत्रण मनपाचेच राहील.जी कर्मचारी वसुलीला जाईल त्यालाच Assessment व टॅक्स वसुलीचे कामे देण्यात यावेत. |

| | |
|---|---|
| मा.सभापती | :मा.आयुक्त खुलासा करतील. |
| श्री.आमले रावसाहेब | :सरोश शाळेबाबत मला माहिती मिळाली नाही. |
| मा.सभापती | :आयुक्त टॅक्स बाबतीत बोलतील. |
| मा.आयुक्त | :सरोशच्या शाळेस संबंधीत अधिकारी यांना आजच पाठवुन अहवाल घ्यावा. वसुली बाबत प्रत्येक वॉर्डामध्ये 5 टिम तयार करण्यात आलेल्या आहेत. वॉर्ड अभियंता यांचेकडे वसुलीची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. प्रत्येक वॉर्ड कार्यालयास वॉर्ड गार्डीयन देण्यात आलेले आहे. ते पूर्ण वॉर्डावर वसुली संदर्भात निमंत्रण ठेवू शकेल. Division Place/Govt. Office येथील 19,000/- कर्मचारी यांनी टॅक्स भरावा. वर्षापुर्वी वसुली बाबतीत करमुल्य निर्धारक व संकलक यांनी लक्ष घालावे. दिड महिनांच बाकी आहे. वसुलीकडे आम्ही पूर्ण लक्ष देत आहोत. कृपया सर्वांनी सहकार्य करावे. सध्या वसुलीवर पूर्ण लक्ष केंद्रीत आहे. Reassisment होणे आवश्यक आहे आणि ते लवकरच करण्यात येईल. |
| मा.सभापती | :याबाबत सर्वसाधारण सभेमध्ये निर्णय घेण्यात येईल. |
| श्री.मनगटे गजानन | :भुमीगत व समांतर बाबतीत. डी.पी.रस्त्याबाबत सर्वसाधारण सभेमध्ये विषय आहे. येथे निर्णय घेणे योग्य नाही. |
| मा.सभापती | :प्रोझोन मॉल, डी.मार्टच्या माहिती द्यावी. पार्कींग बाबत सभागृहाला नाईकवाडी बाबत माहिती घ्यावी. |
| श्री.अय्युब खान | :प्रोझोन मॉलला पार्कींग टॅक्स लावण्यात आलेला आहे. |
| श्री.बारवाल गजानन | :पे ॲण्ड पार्क निराला बाजार मोतीवाला कॉम्प्लेक्सच्या परवानगी बाबतीत मला पुढील सभेत माहिती देण्यात यावी. |
| श्री.चित्ते नितीन | :सिडकोचे 22 वॉर्ड आहे. बांधकाम करतांना सिडकोच्या एनओसी ची गरज आहे का? |
| श्री.देशमुख (Dy.Eng) | :सन 2006 पासुन सिडकोची एनओसी आवश्यक असते. एनओसी चा कालावधीत सिडको ठरवून देते. |
| श्री.चित्ते नितीन | :Rathi Consultation बाबतीत दिलेल्या पत्राचे माहिती द्यावी. |
| उपअभि.श्री.फड बी.डी. | :संबंधीत बिल्डर ने एन.ओ.सी. दाखल केलेली आहे का? प्रस्ताव मंजुर केलेला आहे. प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही. |
| श्री.चित्ते नितीन | :जुनी एन.ओ.सी. चालते का? 302 चौ.फुट जुनी 2002 ची एनओसी चालत नाही. तर चलन का भरुन घेतले. सर्व सामान्यांसाठी वेगळा व बिल्डरसाठी वेगळा न्याय का? |
| श्री.एडके विकास | :टीडीआर बाबतीत काय कार्यवाही झाली? |
| श्री.देशमुख (Dy.Eng) | :स.स.श्री.एडके यांच्या बाबतीत आमच्या नगर रचना विभागाने अहवाल यापुर्वी दिला आहे. |
| श्री.चित्ते नितीन | :फाजलपुरा प्रकरणात 3 ते 4 अधिकारी होते. एका अधिकाऱ्याची बदली करुन चालणार नाही. विभागीय चौकशीच्या फाजलपुरा प्रकरणी 3 ते 4 अधिकारी यांची चौकशी करण्यात आली. परंतु एकाच अधिकारी यांची बदली करण्यात आली. एक सेवानिवृत्त अधिकारी नगर रचना विभागात येवून संचिकेची पाहणी करतो. सी.सी.टी.व्ही. फुटेज पाहण्यात यावे. त्याचे मनपात काय काम आहे? लेखा विभागा सारखीच टोकन पध्दत ही नगर रचना विभागासाठी सुरु करावी याचे आदेश आजच देण्यात यावे. |

श्री.एडके विकास :एका अधिकाऱ्याची बदली करण्यात आली. दोन अधिकाऱ्यांवर का कार्यवाही करण्यात आली नाही? सन 1985 मध्ये मोबदला दिला आहे. उर्वरीत कर्मचाऱ्यांच्या बाबतीत कार्यवाही का करण्यात आली नाही / सीटीएस नं.11601,11602, सन 1995 ला 95,000/- 1,17,000/- मोबदला देण्यात आला आहे.

मा.सभापती :या बाबत आठ दिवसात माहिती देण्यात यावी.

श्री.बारवाल गजानन : जगदेव हॉ.सौ. त्या ठिकाणी शाळेचे आणि इतर आरक्षण आहे. त्या ठिकाणी फेन्सिंग आणि बांधकाम झाले आहे. कॉन्ट्रेक्टर कोर्टाच्या वाद लक्षात घेता परवानगी देऊ नये. न्यायालयात वाद आहे.

मा.सभापती :पाहणी करुन बांधकाम थांबविण्यात यावे.

श्री.नाईकवाडी.अ.रहिम :हर्सुल तलावात दोन मुले मुत्यु पावले त्यांना आर्थिक मदत अद्याप मिळाली नाही. Birth Certificates प्रकरणात दोन दिवसात Problem Solve करतो म्हणुन MOH यांनी आश्वासन दिले होते. परंतु अद्याप पर्यंत कुठलीच कार्यवाही झालेली नाही.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी:दोन Birth Certificates चा इशु आहे. एक प्रमाणपत्र (जन्म) रद्द करावे लागेल. हे अधिकार पुण्याचे अधिकारी मुख्य निबंधक यांचेकडे असून त्यानुसार प्रकरण पूणे येथे मुख्य निबंधकाकडे वर्ग करण्यात आले आहे.

मा.सभापती :या बाबत त्वरीत कार्यवाही करावी. नियमावली ठरविण्यात यावी. सर्व Birth / Death प्रमाणपत्र बाबत सुचना द्याव्या. नागरीकांना त्रास होणार नाही याची शासनाने काळजी घ्यावी.

श्री.बारवाल गजानन :सिध्दार्थ गार्डन येथे एका वाघांचा मृत्यू पावलेला आहे.

श्री.चित्ते नितीन :या दुर्दैवी प्रकरण घडलेला आहे. माहिती देण्यात यावी.

श्री.एडके विकास :त्याच्या शेपटीला चावा घेतला होता का?

श्री.बारवाल गजानन :पोस्ट मार्टम वाघाचा रिपोर्ट पुढच्या सभेपुढे देण्यात यावे.

श्री.चित्ते नितीन :दिनांक 22.12.2015 ला एक वन्यप्राणी पळाला होता.

संचालक प्राणी संग्रहालय :एक माकड पिंजरा वाकुन पळाला होता. त्यास कर्मचारी यांनी पून्हा ताब्यात घेतले आहे. गुड्डु नावाच्या वाघ हा 18 ते 20 वर्षाचा होता. त्याचा वार्ध्यक्यामुळे मृत्यू झालेला आहे. हार्ट अटॅकने त्याचा मृत्यू झाला. असे प्राथमिक निदानावरून दिसून येते. पोस्टमॉर्टमचा रिपोर्टमध्ये सविस्तर माहिती मिळेल.

मा.सभापती :प्राणी संग्रहालय येथील पिंजरा दुरुस्ती बाबत त्वरीत कार्यवाही करावी.

श्री.आमले रावसाहेब :हायवे रोडवरील मटणाच्या दुकाना बाबत तक्रार होत आहे. दुर्लक्ष होत आहे.

मा.सभापती :स.सदस्यांच्या तक्रारीकडे तातडीने लक्ष देण्यात यावे.

श्री.बारवाल गजानन :संतोष मालपाणी यांना गणेश विर्सजणामध्ये फोकस लावण्याचे काम दिले होते. त्यांचे थकीत पेमेंट अदा करण्यात यावे.

मा.सभापती :मुख्यलेखाधिकारी यांनी त्वरीत पेमेंट अदा करावे.

श्री.आमले रावसाहेब :काकनाटे यांची बदली झाली आहे. बदली रद्द करण्यात यावे.

उपआयुक्त (प्रशासन) :जो प्रश्न उपस्थित झाला आहे त्याबाबत माहिती घेवून कार्यवाही करण्यात येईल.

श्री.नितीन चित्ते : एनयुएलएम विभागामध्ये दोन कर्मचारी गेल्या 22 ते 23 वर्षापासून समुह संघटक म्हणुन महानगरपालिकेची सेवा बजावत आहे. सध्या त्यांना जुन्याच दराने मानधन देण्यात येते. इतर समुह संघटीकांप्रमाणे त्यांनाही एनयुएलएम या शासनाच्या नविन

योजनेअंतर्गत देण्यात येत असलेल्या मानधन रूपये 10,000/- शासन निर्णयाच्या दिनांक 01/04/2014 पासून महानगरपालिकेतुन दरमहा (मानधन) नियमानुसार देण्यात यावे.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा करावा.

उपआयुक्त (NULM) : सभागृहामध्ये जो प्रश्न उपस्थित केला आहे, त्याबाबत माहिती घेऊन नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

मा.सभापती : स.स. यांनी केलेल्या चर्चेनुसार, सदर कर्मचारी जेष्ठ असून त्यांची महानगरपालिकेतील 22 ते 23 वर्षाची सेवा बघता शासन निर्णयानुसार, शासन दिनांकापासून मानधनात वाढ करण्याबाबत नियमानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी. तसेच या योजनेअंतर्गत शासन निर्णयानुसार मानधनात होणारी वाढ वेळोवेळी सदर कर्मचारी यांना लागू करण्याबाबत प्रशासनाने नियमानुसार अंमलबजावणी करावी.

श्री.नितीन चित्ते :टि.व्ही. सेंटर येथील गाळयाच्या बाबत जे झालेले आहे. तसे यामध्ये होऊ नये, बिले दराने भरणा केलेली आहे मनपाचा यामध्ये फायदाच आहे. परंतु काम सुरु करून परवडत नाही. म्हणून अर्धवट अवस्थेत काम सोडून देणे योग्य नाही. संबंधीत ठेकेदाराकडून एक बॉन्ड घेण्यात यावा. तांत्रिकदृष्ट्या कंत्राटदार पूर्ण करेल याची जबाबदारी शहर अभियंता यांचेवर सोपविण्यात यावी. अशी विनंती करण्यात येते.

श्री.गजानन बारवाल :Below असल्यामुळे काम देण्यास हरकत नाही. कामाच्या दर्जाबाबत लक्ष देण्यात यावे.

कार्य.अभि.(इ/फ) :यामध्ये किती दवाखान्याचे कामे करावयाचे आहे. दोन नविन दवाखाने बनवत आहेत, नारेगांव व हर्सुल, अंबिका नगर, पीरबाजार, नेहरूनगर, एन-7 येथील दवाखान्याचे दुरुस्तीचे कामे आहेत.

: कटकट गेट येथील दवाखान्याचा प्रश्न प्रलंबित आहे.

कार्य.अभि.(इ/फ) :डी.पी.डि.सी. मध्ये प्रश्न प्रलंबित आहे. फंड प्राप्त झाल्यास नेहरूनगर, कटकटगेट येथील काम करण्यात येईल.

श्री.मनगटे गजानन :Below दराने काम करीत असल्याने संबंधीत कंत्राटदारा कडून 10 ते 15 टक्के डिपॉझिट जमा करुन घेण्यात यावे.

श्री.गजानन बारवाल :सर्व मनपाचे दवाखान्यांमध्ये साफसफाईचे कामे करण्यात यावी. पाणी पुरवठ्याची व्यवस्था करण्यात यावी. पाण्याचा हौद साफ करून घेण्यात यावा.

मा.सभापती :MOH यांनी याबाबीची दखल घेवून कार्यवाही करावी.

**विषय क्र. 39 :**

मा.आयुक्त यांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन.यु.एच.एम. अंतर्गत पवननगर (सिडको एन-7) येथे आरोग्य केंद्राची इमारत बांधणे बाबतच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2014-2015 च्या दरसूची नुसार रक्कम रूपये 55,36,356/- चे अंदाजपत्रक असून सदरील कामाचा खर्च शासनाकडून प्राप्त झालेल्या एन.यु.एच.एम. या अनुदानातून प्रस्तावित आहे. सदर कामासाठी जा.क्र./मनपा/ ई-निविदा/084/2015-16, दिनांक 27/10/2015 अन्वये निविदा पत्रके मागविली असता, एकूण नऊ निविदा दर भरून प्राप्त झाल्या, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 01 | नाज डेव्हलपर्स | अ.प. दरापेक्षा 17.11% कमी दराने |
| 02 | काझी गोहर मोहीनुद्दीन | अ.प. दरापेक्षा 13.13% कमी दराने |
| 03 | सहारा कन्स्ट्रक्शन | अ.प. दरापेक्षा 11.01% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 04 | एम.ए.सिद्दीकी | अ.प. दरापेक्षा 10.76% कमी दराने |
| 05 | बिल्डवेल कन्स्ट्रक्शन | अ.प. दरापेक्षा 10.70% कमी दराने |
| 06 | शेख मोहमंद इब्राहीम | अ.प. दरापेक्षा 10.20% कमी दराने |
| 07 | पदमावती कन्स्ट्रक्शन | तांत्रिकदृष्ट्या नाकारण्यात आले |
| 08 | पटेल कन्स्ट्रक्शन | अ.प. दरापेक्षा 7.86% कमी दराने |
| 09 | अमन असोसिएटस् | अ.प. दरापेक्षा 5.00% कमी दराने |

वरीलप्रमाणे प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या म्हणजे सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.11% कमी दराची मे.नाज डेव्हलपर्स यांची निविदा प्राप्त आहे.

तरी सदरील कामासाठी मे.नाज डेव्हलपर्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.11% कमी दराच्या निविदेचा प्रस्ताव थर्ड पार्टी इन्स्पेक्शनच्या अटीसह मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : सर्व स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता, कमी दरामध्ये चांगल्या दर्जाचे काम करू शकेल की नाही अशा शंका उत्पन्न झालेल्या आहेत. थर्ड पार्टी इन्स्पेक्शन सोबतच संबंधीत कंत्राटदाराकडून 5% अतिरिक्त डिपॉझिट भरून घेवून या कामाची वर्कऑर्डर देण्यांत यावी. अतिरिक्त डिपॉझिट भरण्यास तयार नसल्यास शॉर्ट टेंडर नोटीस काढण्यात यावी. यापूढील कोणत्याही निविदा अशाप्रकारे आल्यास 10 % अतिरिक्त डिपॉझिट भरून घेण्यात यावे. जेणेकरून कामाची गुणवत्ता व वेळेत काम होईल. विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन.यु.एच.एम. अंतर्गत पवननगर (सिडको एन-7) येथे आरोग्य केंद्राची इमारत बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.11% कमी दराची मे.नाज डेव्हलपर्स यांची निविदा थर्ड पार्टी इन्स्पेक्शनच्या अटीसह स्विकारणेस मान्यता देण्यांत येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार कमी दरामध्ये चांगल्या दर्जाचे काम करू शकेल की नाही अशा शंका उत्पन्न झाल्यामुळे, थर्ड पार्टी इन्स्पेक्शन सोबतच संबंधीत कंत्राटदाराकडून 5% अतिरिक्त डिपॉझिट भरून घेणे, यानंतरच कामाची वर्कऑर्डर देण्यास व अतिरिक्त डिपॉझिट भरण्यास तयार नसल्यास शॉर्ट टेंडर नोटीस काढणे आणि यापूढील कोणत्याही निविदा अशाप्रकारे आल्यास 10 % अतिरिक्त डिपॉझिट भरून घेणे, जेणेकरून कामाची गुणवत्ता व वेळेत काम होईल. यासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 40 :**

मा.आयुक्त यांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन.यु.एच.एम. अंतर्गत गांधीनगर येथे आरोग्य केंद्राची इमारत बांधणे बाबतच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2014-2015 च्या दरसूची नुसार रक्कम रूपये 55,36,356/- चे अंदाजपत्रक असून सदरील कामाचा खर्च शासनाकडून प्राप्त झालेल्या एन.यु.एच.एम. या अनुदानातून प्रस्तावित आहे. सदर कामासाठी जा.क्र./मनपा/ई-निविदा/084/2015-16, दिनांक 27/10/2015 अन्वये निविदा पत्रके मागविली असता, एकूण नऊ निविदा दर भरून प्राप्त झाल्या, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 01 | नाज डेव्हलपर्स | अ.प. दरापेक्षा 17.11% कमी दराने |
| 02 | काझी गोहर मोहीनुद्दीन | अ.प. दरापेक्षा 13.13% कमी दराने |
| 03 | सहारा कन्स्ट्रक्शन | अ.प. दरापेक्षा 11.01% कमी दराने |
| 04 | कुरेशी मो.अब्दुल खलील | अ.प. दरापेक्षा 11.01% कमी दराने |
| 05 | बिल्डवेल कन्स्ट्रक्शन | अ.प. दरापेक्षा 9.50% कमी दराने |
| 06 | पटेल कन्स्ट्रक्शन | अ.प. दरापेक्षा 8.44% कमी दराने |

वरीलप्रमाणे प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या म्हणजे सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.11% कमी दराची मे.नाज डेव्हलपर्स यांची निविदा प्राप्त आहे.

तरी सदरील कामासाठी मे.नाज डेव्हलपर्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.11% कमी दराच्या निविदेचा प्रस्ताव थर्ड पार्टी इन्स्पेक्शनच्या अटीसह मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : सर्व स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता, कमी दरामध्ये चांगल्या दर्जाचे काम करू शकेल की नाही अशा शंका उत्पन्न झालेल्या आहेत. थर्ड पार्टी इन्स्पेक्शन सोबतच संबंधीत कंत्राटदाराकडून 5% अतिरिक्त डिपॉझिट भरून घेवून या कामाची वर्कऑर्डर देण्यांत यावी. अतिरिक्त डिपॉझिट भरण्यास तयार नसल्यास शॉर्ट टेंडर नोटीस काढण्यात यावी. यापूढील कोणत्याही निविदा अशाप्रकारे आल्यास 10 % अतिरिक्त डिपॉझिट भरून घेण्यात यावे. जेणेकरून कामाची गुणवत्ता व वेळेत काम होईल. विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन.यु.एच.एम. अंतर्गत गांधीनगर येथे आरोग्य केंद्राची इमारत बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.11% कमी दराची मे.नाज डेव्हलपर्स यांची निविदा थर्ड पार्टी इन्स्पेक्शनच्या अटीसह स्विकारणेस मान्यता देण्यांत येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार कमी दरामध्ये चांगल्या दर्जाचे काम करू शकेल की नाही अशा शंका उत्पन्न झाल्यामुळे, थर्ड पार्टी इन्स्पेक्शन सोबतच संबंधीत कंत्राटदाराकडून 5% अतिरिक्त डिपॉझिट भरून घेणे, यानंतरच कामाची वर्कऑर्डर देण्यास व अतिरिक्त डिपॉझिट भरण्यास तयार नसल्यास शॉर्ट टेंडर नोटीस काढणे आणि यापूढील कोणत्याही निविदा अशाप्रकारे आल्यास 10 % अतिरिक्त डिपॉझिट भरून घेणे, जेणेकरून कामाची गुणवत्ता व वेळेत काम होईल. यासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 41 :**

मा.आयुक्त यांच्या मंजुरीने प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, एन-10 सिडको टी.व्ही.सेंटर येथे खेळाचे मैदानासाठी (PG-4) जागा राखीव असुन, या खेळाच्या मैदानाच्या लगत रस्त्याच्या उत्तर व पुर्व बाजुने एन-5 सिडको येथील व्यापारी संकुलाच्या धर्तीवर 51 दुकाने बांधण्याचा निर्णय घेण्यात आलेला होता. त्या नुसार सदरील कामासाठी सन 2013-14 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रु.4,12,70,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले होते. त्यास मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र 456 दिनांक 16.1.2014 अन्वये दिलेल्या मंजुरी अंती सदरील कामासाठी ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या असता सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 13.51% कमी दराची निविदा मस्कट कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा प्राप्त झाली होती. त्यास मा. स्थायी समितीने विषय क्र 170 दिनांक 17.2.2014 अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरील काम हाती घेण्यात आलेले होते.

तथापि सदर काम थांबविणे बाबत सिडको कार्यालयाकडून जा.क्र/सिडको/प्रशा/औ,बा/नियोजन/ 2014/05 दिनांक 28.11.2014 रोजी पत्र प्राप्त झाल्याने काम थांबविण्यात आलेले होते. आता सदरील काम सुरु करणे बाबत सिडको कार्यालयाने त्यांचे कार्यालयीन पत्र क्र.CODCP/SP(NT)/AUR/2015/64 Date 8.7.2015 सुमारे 8 महिन्या नंतर ना हरकत पत्र दिले असल्याने संबधीत गुत्तेदारास काम सुरु करणे बाबत कळविले असता गुत्तेदाराने लेखी पत्र देऊन कळविले आहे बी-1 निविदा कलम 15 नुसार सदरील काम बऱ्याच कालावधीपासून बंद असल्याने आता बाजारात बांधकाम साहित्याचे व लेबर रेट दुप्पट प्रमाणात वाढल्याने सदरील काम करणे मला परवडत नसल्याचे कळविले आहे त्यामुळे या कंत्राटदाराचे काम जैसे थे अंतिम करण्यात येत आहे.

त्यामुळे आता उर्वरीत कामासाठी नव्याने सा.बा.विभागाच्या सन 2014-15 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रु.3,77,44,000/- अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन त्यास मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिल्या नुसार ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या असता एकुण 3 निविदा दर भरुन प्राप्त झाल्या आहेत त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | कंत्रादाराचे नाव | निविदा दर |
|---|---|---|
| 1 | एम.ए.सिद्यीकी | अ.प.दरापेक्षा 7.29% कमी दराने |
| 2 | के.बी.पाथ्रीकर | अ.प.दरापेक्षा 4.15% कमी दराने |
| 3 | मे.पटेल कन्स्ट्रक्शन | अ.प.दरापेक्षा 2.86% कमी दराने |

त्यानुसार तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.29% कमी दराची निविदा एम.ए.सिद्यीकी यांची प्राप्त झालेली आहे. त्यानुसार एम.ए.सिद्यीकी यांची निविदा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-10 सिडको टी.व्ही.सेंटर येथे खेळाचे मैदानासाठी (PG-4) जागा राखीव असुन, या खेळाच्या मैदानाच्या लगत रस्त्याच्या उत्तर व पुर्व बाजुने एन-5 सिडको येथील व्यापारी संकुलाच्या धर्तीवर 51 दुकाने बांधण्याच्या उर्वरीत कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैंकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक एम.ए.सिद्यीकी यांचेकडून सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.29% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 42 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, श्रीमती कल्पना बारिकराव पाटील सहशिक्षिका के.प्रा.शा. इंदिरानगर बायजीपुरा यांनी या कार्यालयास दिनांक 14/05/2015 रोजी अर्ज करून त्यामध्ये त्यांचा मुलगा चि.प्रसन्ना यास कर्करोग झाल्याचे निष्पन्न झाले असून त्याचेवर कोडलीकेरी हॉस्पीटल, औरंगाबाद या ठिकाणी वैद्यकीय उपचार सुरू असल्याचे कळविले त्यास्तव त्यांचे मागणीप्रमाणे व रूग्णालयाचे वैद्यकीय खर्चाचे अंदाजपत्रका आधारे, शासन निर्णयातील तरतुदीनुसार त्यांना रू.1,50,000/- अग्रीम या कार्यालयाचे आदेश जा.क्र./मनपा/शिक्षण/273/2015 दिनांक 18/05/2015 रोजी देण्यात आले होते.

श्रीमती पाटील सहशिक्षिका यांनी दि.30/10/2015 रोजी विनंती अर्ज व वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आवश्यक ती सर्व कागदपत्रे या कार्यालयास सादर करून अग्रीम रक्कमेचे समायोजन करणे व झालेला जास्तीचा खर्च प्रदान करण्यासाठी विनंती केली आहे.

संबंधीतांनी कर्करोगाचे उपचार घेतलेले कोडलीकेरी हॉस्पीटल, औरंगाबाद हे महाराष्ट्र शासन निर्णय क्र. सार्वजनिक आरोग्य विभाग क्र./वेखप्र/2011/प्र.क्र.333/2011 सकावी 2 मंत्रालय, मुंबई-32 दि.16/11/2011 अन्वये जारी केलेल्या परिशिष्ट "अ" नुसार शासकीय कर्मचारी/कुटूंबीयांनी खाजगी रूग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रूग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञयेतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रूग्णालयाची अद्यावत यादी दि.16/11/2011 मधील प्रसिध्द रूग्णालयाच्या यादीत सदरील रूग्णालयाचे नाव समाविष्ठ आहे.

त्यानुसार आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका यांनी प्रस्ताव पडताळणी अंती केलेल्या शिफारशीनुसार वैद्यकीय उपचारार्थ आलेला एकूण खर्च र.रू.4,23,965/- असून त्यापैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रू.82217/- वजा जाता रू.3,41,748/- च्या 90% रक्कम रू.3,07,573/- इतकी होते. एकूण खर्चाच्या 5% रक्कम रू.21198/- मनपा फंडात जमा करता संबंधीतास देय रक्कम 2,86,375/- इतकी होते. या रक्कमे मधुन अग्रीम प्रदान करणेत आलेली रक्कम रू.1,50,000/- वजा जाता आता त्यांना निव्वळ देयक रक्कम रू.1,36,375/- इतकी आहे. सदर वैद्यकीय खर्च रक्कम रू.2.00 लक्ष पेक्षाच्या जास्त असल्याने व या रक्कमेच्या अदाईस मा.स्थायी समिती सभेची मंजुरी आवश्यक असल्याने श्रीमती कल्पना

पाटील सहशिक्षिका यांना मुलाच्या कर्करोग वैद्यकीय उपचारार्थ आलेला खर्च रू.2,86,375-1,50,000 = 1,36,375/- (अक्षरी रू.एक लक्ष छत्तीस हजार तीनशे पंच्याहत्तर) प्रदान करणेसाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : ऐनवेळचे सर्व विषय मंजुर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती कल्पना बारिकराव पाटील सह शिक्षिका के.प्रा.शा. इंदिरानगर बायजीपुरा यांनी त्यांचा मुलगा चि.प्रसन्ना याच्या कर्करोग या आजारावर कोडलीकेरी हॉस्पीटल, औरंगाबाद येथे केलेल्या वैद्यकीय उपचारार्थ प्रतिपुर्तीसाठी आवश्यक ती सर्व कागदपत्रे कार्यालयास सादर करून केलेला एकूण खर्च र.रू.4,23,965/- त्यापैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रू.82217/- वजा जाता रू.3,41,748/- च्या 90% रक्कम रू.3,07,573/- तसेच एकूण खर्चाच्या 5% रक्कम रू.21198/- मनपा फंडात जमा करून संबंधीतास देय रक्कम रू.2,86,375-1,50,000 = 1,36,375/- (अक्षरी रू.एक लक्ष छत्तीस हजार तीनशे पंच्याहत्तर) प्रदान करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 43 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, श्री.प्रविण पुंडलिकराव रांजणगांवकर, नोंदणी लिपीक, आरोग्य विभाग महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांची आई श्रीमती कृष्णाबाई पुंडलिकराव रांजणगांवकर यांच्या हृदयाचे आजार (Coronary Artery Disease Angioplasty) या गंभीर आजारावर शासन मान्य खाजगी रूग्णालय कमलनयन बजाज हॉस्पीटल, बीड बायपास रोड, औरंगाबाद येथे उपचार केलेला असून त्या उपचारार्थी झालेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

अर्जदाराने आवश्यक विहीत नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असून त्यांना हृदयाचे आजार (Coronary Artery Disease Angioplasty) उपचारार्थ एकूण केलेला खर्च रक्कम रू.2,35,629/- इतका झाला असून त्यापैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रू.20,626/- वजा जाता रू.2,15,003/- शिल्लक राहते. शिल्लक रक्कमेच्या 90% रू.1,93,503/- इतकी होते. एकूण खर्चाच्या 5% रक्कम रू.11,781/- ही मनपा फंडात जमा करता निव्वळ देय रक्कम रू.1,81,722/- संबंधीतास अदा करावयाची आहे.

संबंधीताने उपचार कमलनयन बजाज हॉस्पीटल, बीड बायपास रोड औरंगाबाद हे महाराष्ट्र शासन निर्णय क्र. सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.2011/प्र.क्र.333/11/राकावि-2/मंत्रालय,मुंबई-32 दि.16/11/2011 अन्वये व शासन परिपत्रक क्र. वैखप्र-2013/प्र.क्र.291/13/राकावि-2 दि.11/10/2013 मधील रूग्णालयाच्या यादीत जारी केलेल्या परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रूग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रूग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रूग्णालयाच्या अद्यावत यादीत सदरच्या रूग्णालयाचे नांव समाविष्ट आहे. सदरचा प्रस्ताव पडताळणी करून वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

संबंधीतास हृदयाचे आजार (Coronary Artery Disease Angioplasty) हे गंभीर स्वरूपाचे आजार असून शासन निर्णयाच्या अधिन राहून रक्कम रू.1,81,722/- अदा करण्यासाठी मा.स्थायी समितीची मंजूरी आवश्यक आहे.

करीता रक्कम रू.1,81,722/- (अक्षरी रू.एक लक्ष एक्याऐंशी हजार सातशे बावीस मात्र) वैद्यकीय प्रतिपुर्ती रक्कम श्री.प्रविण पुंडलिकराव रांजणगांवकर, नोंदणी लिपीक, आरोग्य विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांना अदा करण्यासाठीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.प्रविण पुंडलिकराव रांजणगांवकर, नोंदणी लिपीक, आरोग्य विभाग महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांची आई श्रीमती कृष्णाबाई पुंडलिकराव रांजणगांवकर यांच्या हृदयाचे

आजार (Coronary Artery Disease Angioplasty) या गंभीर आजारावर शासन मान्य खाजगी रूग्णालय कमलनयन बजाज हॉस्पीटल, बीड बायपास रोड, औरंगाबाद येथे केलेल्या उपचारार्थ झालेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती करण्यासाठी दाखल केलेल्या रक्कम रू.2,35,629/- पैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रू.20,626/- वजा जाता रू.2,15,003/- या शिल्लक रक्कमेच्या 90% रू.1,93,503/- एकूण खर्चाच्या 5% रक्कम रू.11,781/- मनपा फंडात जमा करून संबंधीतास देय रक्कम रू.1,81,722/- (अक्षरी रू.एक लक्ष एक्याऐंशी हजार सातशे बावीस मात्र) अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 44 :**

मा.आयुक्त यांच्या मान्यतेनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचा सिध्दार्थ उद्यान येथील सिध्दार्थ जलतरण तलाव महानगरपालिकेतर्फे चालविण्यात येत आहे. नागरीकांना कमी शुल्क आकारून आरोग्याचे साधन म्हणुन जरी ही सेवा दिली जात असली तरी ही सेवा तोट्यात न जाता ना नफा ना तोटा या तत्वावर चालविली पाहिजे.

सिध्दार्थ जलतरण तलावावर एकुण 13 कर्मचारी कार्यरत असून त्यांचे आस्थापनेवर व वार्षिक देखभाल दुरूस्तीवर होणारा खर्च अंदाजे 42 लक्ष रूपया पर्यंत आहे व तलावाचे वार्षिक उत्पन्न सन 1994 ते 2008 पर्यंत सरासरी 11 लक्ष रूपये इतके असून सन 2012 मध्ये हे उत्पन्न 53,55,625/- इतके झाले आहे.

सिध्दार्थ जलतरण तलावासाठी मिळणारे पाणी यापूर्वी मनपाकडे पाणी पुरवठा असतांना निशुल्क मिळत होते. परंतु आता पाणी पुरवठ्याचे खाजगीकरण झाल्यामुळे, पाणी पुरवठ्याकरीता मीटर बसविण्यात आले आहे. त्यामुळे पाणी पुरवठ्याचेही देयक मनपाला द्यावे लागणार आहे. जलतरण तलावासाठी लागणारा पाणी पुरवठा खर्च, आस्थापना खर्च, रासायनिक साहित्याचा खर्च, विद्युत देयक, जलतरण तलावाची देखभाल व दुरूस्ती खर्च भविष्यात होणारी कर्मचाऱ्यांची पगारवाढ व महागाई यामुळे जलतरण तलावापासून मिळणारे उत्पन्न व होणाऱ्या खर्चात मोठी तफावत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

औरंगाबाद शहरात हॉटेल व्यावसायिक व खाजगी संस्थेमार्फत चालविले जाणारे तलतरण तलावासाठी व मनपाच्या जलतरण तलावासाठी सध्या आकारण्यात येणारे दर खालीलप्रमाणे आहेत.

**तक्ता क्रमांक - 1**

| अ.क्र. | संस्थेचे नांव | मासिक शुल्क | वार्षिक शुल्क |
|---|---|---|---|
| 01 | सिध्दार्थ जलतरण तलाव, महानगरपालिका औरंगाबाद | रूपये 700/- | रूपये 4000/- |
| 02 | हॉटेल अजंता ॲम्बेसेडर | रूपये 4000/- | रूपये 16000/- |
| 03 | राकाज लाईफस्टाईल क्लब | रूपये 2500/- | रूपये 12000/- |
| 04 | औरंगाबाद जिमखाना क्लब | रूपये 3500/- | रूपये 13000/- |
| 05 | MGM हेल्थ ॲन्ड स्पोर्ट क्लब | रूपये 4000/- | रूपये 16800/- |

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, महानगरपालिकेतर्फे चालविल्या जाणाऱ्या जलतरण तलावापेक्षा खाजगी जलतरण तलावाचे दर हे 4 ते 5 पटीने जास्तीचे आहे. त्यामुळे महानगरपालिकेतर्फे चालविल्या जाणाऱ्या जलतरण तलावाचे दरही वाढविणे आवश्यक आहे.

**तक्ता क्रमांक - 1**

| अ.क्र. | कालावधी | वर्तमान दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| 01 | मासिक | रूपये 700/- | रूपये 1800/- |
| 02 | त्रिमासिक | रूपये 1800/- | रूपये 4000/- |
| 03 | वार्षिक | रूपये 4000/- | रूपये 10000/- |
| 04 | आजीव | रूपये 30000/- (मर्यादा 20 वर्षे) | रूपये 40000/- |

**तक्ता क्रमांक - 2**

**कौटुंबिक**

**(आई,वडिल व दोन मुलांकरीता मर्यादीत)**

| अ.क्र. | कालावधी | वर्तमान दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| 01 | मासिक | रूपये 1500/- | रूपये 4000/- |
| 02 | त्रिमासिक | रूपये 4000/- | रूपये 8000/- |
| 03 | वार्षिक | रूपये 10000/- | रूपये 15000/- |

**तक्ता क्रमांक - 3 इतर शुल्क**

| अ.क्र. | कालावधी | वर्तमान दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| 01 | ओळखपत्र | रूपये 25/- | रूपये 25/- |
| 02 | चाचणी | रूपये 20/- | रूपये 20/- |
| 03 | प्रवेश फॉर्म | रूपये 05/- | रूपये 05/- |
| 04 | प्रशिक्षण | रूपये 300/- | रूपये 500/- |
| 05 | एक तासाकरीता शुल्क | रूपये 50/- | रूपये 150/- |
| 06 | दंड | रूपये 50/- | रूपये 50/- |

**12 वर्षाखालील सभासद**

| अ.क्र. | कालावधी | वर्तमान दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| 01 | मासिक | रूपये 400/- | रूपये 1000/- |
| 02 | त्रिमासिक | रूपये 1000/- | रूपये 2500/- |
| 03 | वार्षिक | रूपये 2000/- | रूपये 5000/- |
| 04 | आजीव | रूपये 30000/- (मर्यादा 20 वर्षे) | रूपये 40000/- (मर्यादा 20 वर्षे) |

तसेच सिध्दार्थ जलतरण तलाव येथे मनपाच्या क्रिडा विभागामार्फत चालविण्यात येत होती ती व्यायाम शाळा सिध्दार्थ जलतरण तलाव अंतर्गत चालवुन सध्याचे दर व प्रस्तावित दर खालील दर्शविल्याप्रमाणे आहेत.

**जिम्नॅशियम**

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | मासिक | रूपये 100/- | रूपये 250/- |
| 02 | ओळखपत्र | --- | रूपये 40/- |
| 03 | प्रवेश फॉर्म | --- | रूपये 10/- |

तरी सिध्दार्थ जलतरण तलाव व व्यायाम शाळा यांचे करिता वरील दर्शविल्याप्रमाणे प्रस्तावित दर मान्य केल्यास उत्पन्न व खर्च यामध्ये होणारी तुट भरून काढता येईल व नागरीकांना चांगली सेवा पुरविता येईल.

करीता सिध्दार्थ जलतरण तलाव व व्यायाम शाळा यांना आकारण्यात येणारे प्रस्तावित दरास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या सिध्दार्थ उद्यान येथील सिध्दार्थ जलतरण तलाव व व्यायाम शाळा करिता प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या वाढीव दरास खालीलप्रमाणे सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**तक्ता क्रमांक - 1**

| अ.क्र. | कालावधी | वर्तमान दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| 01 | मासिक | रूपये 700/- | रूपये 1800/- |
| 02 | त्रिमासिक | रूपये 1800/- | रूपये 4000/- |
| 03 | वार्षिक | रूपये 4000/- | रूपये 10000/- |
| 04 | आजीव | रूपये 30000/- (मर्यादा 20 वर्षे) | रूपये 40000/- |

**तक्ता क्रमांक - 2**

**कौटुंबिक**

**(आई,वडिल व दोन मुलांकरीता मर्यादीत)**

| अ.क्र. | कालावधी | वर्तमान दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| 01 | मासिक | रूपये 1500/- | रूपये 4000/- |
| 02 | त्रिमासिक | रूपये 4000/- | रूपये 8000/- |
| 03 | वार्षिक | रूपये 10000/- | रूपये 15000/- |

**तक्ता क्रमांक - 3 इतर शुल्क**

| अ.क्र. | कालावधी | वर्तमान दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| 01 | ओळखपत्र | रूपये 25/- | रूपये 25/- |
| 02 | चाचणी | रूपये 20/- | रूपये 20/- |
| 03 | प्रवेश फॉर्म | रूपये 05/- | रूपये 05/- |
| 04 | प्रशिक्षण | रूपये 300/- | रूपये 500/- |
| 05 | एक तासाकरीता शुल्क | रूपये 50/- | रूपये 150/- |
| 06 | दंड | रूपये 50/- | रूपये 50/- |

**12 वर्षाखालील सभासद**

| अ.क्र. | कालावधी | वर्तमान दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| 01 | मासिक | रूपये 400/- | रूपये 1000/- |
| 02 | त्रिमासिक | रूपये 1000/- | रूपये 2500/- |
| 03 | वार्षिक | रूपये 2000/- | रूपये 5000/- |
| 04 | आजीव | रूपये 30000/- (मर्यादा 20 वर्षे) | रूपये 40000/- (मर्यादा 20 वर्षे) |

तसेच सिध्दार्थ जलतरण तलाव येथे मनपाच्या क्रिडा विभागामार्फत चालविण्यात येत होती ती व्यायाम शाळा सिध्दार्थ जलतरण तलाव अंतर्गत चालवुन सध्याचे दर व प्रस्तावित दर खालील दर्शविल्याप्रमाणे आहेत.

**जिम्नॅशियम**

| अ.क्र. | कालावधी | वर्तमान दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| 01 | मासिक | रूपये 100/- | रूपये 250/- |
| 02 | ओळखपत्र | --- | रूपये 40/- |
| 03 | प्रवेश फॉर्म | --- | रूपये 10/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 45 :**

गट क्रमांक 20/पैकी मौजे गारखेडा औरंगाबाद येथील श्री.अबरार अहमद पिता महमंद इसाक यांना दिनांक 03/03/1998 रोजी रेखांकनास अंतिम मान्यता दिलेली आहे. रेखांकन अंतिम करतांना उक्त मिळकती मधुन जाणाऱ्या 15.00 मीटर रुंद रस्त्याने बाधीत रक्कमेच्या मोबदला रक्कमेमधुन जमीन विकास शुल्क रक्कम वळती करण्याबाबत अट नमुद केलेली आहे. उक्त बाधीत क्षेत्राचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्यामार्फत विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यात आलेला आहे.

मिळकतधारक यांनी मा.उच्च न्यायालयात 7739/2008 अन्वये रिट पिटीशन दाखल असता, मा.उच्च न्यायालयाने याबाबत दि. 02/09/2009 रोजी आदेशीत केले की, The petition is therefore, disposed of with a direction to the respondent No. 3 to the proceedings under Land Acquisition Act, within a period of 4 months from today and pass an award after calculating the amount to be paid to the petitioner.

It is made clear that on award being passed, after calculations are made by the respondent No. 3, the payment shall be made within a period of 3 weeks from the date of passing of such award.

परंतू अर्जदारास रक्कम अदा करण्यात आलेली नाही. त्यामुळे अर्जदाराने मा.उच्च न्यायालयात अवमान याचिका क्रमांक 182/2015 दाखल केली. परंतू भूसंपादन कार्यवाही सुरु असल्याकारणाने संबंधीतास बाधीत क्षेत्राचा मोबदला संबंधीतास लवकरात-लवकर देणे बाबत मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना आदेशीत केले. त्यानुसार विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद यांनी दिनांक 24/06/2015 रोजी निवाडा जाहीर केला व निवाड्यातील उर्वरीत रक्कम रु.1,08,45,783/- ची मागणी करणारे पत्र दि.18/04/2015, 20/05/2015 व 04/06/2015 अन्वये कळविले. तसेच तत्कालीन मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद अर्धशासकीय पत्रान्वये सदरील रक्कम विना विलंब जमा करणे बाबत विनंती केली आहे. परंतू महानगरपालिकेतर्फे सदरील रक्कम जमा करण्यात आलेली नाही.

तद्नंतर भूसंपादनाचा मोबदला न मिळाल्याकारणाने मिळकत धारकांनी 592/2015 अन्वये पुन्हा अवमान याचिका दाखल केली असता, दि.03/09/2015 रोजी मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी अर्धशासकीय पत्रान्वये संबंधीताची निवाडयाची उर्वरीत रक्कम त्वरीत विना विलंब विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद यांच्याकडे जमा करणे बाबत कळविले आहे. परंतू तत्कालीन मा.आयुक्त महोदय यांनी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थतीत बिकट असल्याकारणाने बाधीत क्षेत्राच्या मोबदल्या ऐवजी संबंधीतास टी.डी.आर. स्वरुपात देण्याबाबत तत्कालीन आयुक्त महोदय यांनी आदेशीत केले, कारण टी.डी.आर नियमावलीतील क्रमांक 28.2.2 नुसार पुर्वीपासुन मनपाच्या ताब्यात किंवा सार्वजनिक वापरात असलेल्या जागेचा मोबदला पुर्वलक्षीप्रभावाने टी.डी.आर. स्वरुपात देता येत नाही. त्याकरीता उक्त रस्त्याने बाधीत क्षेत्राचा मोबदला टी.डी.आर. स्वरुपात देणे बाबत शासनाचे मार्गदर्शन/ परवानगी देणे बाबत विनंती केली असता, अदयापपर्यंत मार्गदर्शन अप्राप्त आहे.

तथापि, अवमान याचिकेच्या दिनांक 15/01/2016 च्या आदेशात संबंधीतास चार आठवडयाच्या आत रक्कम अदा करणे बाबत मा.उच्च न्यालयाने आदेशीत केलेले आहे.

करीता विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद यांच्या अंतिम निवाडयानुसार मोबदला रक्कम रु.2,08,45,783/- पैकी यापुर्वी 50 % रक्कम म्हणुन विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद यांच्याकडे रक्कम रु.1,00,00,000/- जमा करण्यात आली आहे. करीता उर्वरीत रक्कम

रु.1,08,45,783/- मधुन जमिन विकास शुल्काची रक्कम व त्यावरील व्याज असे एकुण रक्कम रु.52,14,661/- वजा करुन उर्वरीत रक्कम रु.56,31,122/- विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद यांच्याकडे जमा करण्याकरीता ठराव मान्यता होणेस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गट क्रमांक 20/पैकी मौजे गारखेडा औरंगाबाद येथील श्री.अबरार अहमद पिता महमंद इसाक यांना दिनांक 03/03/1998 रोजी रेखांकनास अंतिम मान्यता दिलेली असल्याने रेखांकन अंतिम करतांना उक्त मिळकती मधुन जाणाऱ्या 15.00 मीटर रुंद रस्त्याने बाधीत मालमत्ताधारकास विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद यांच्या अंतिम निवाडयानुसार मोबदला रक्कम रु.2,08,45,783/- पैकी यापुर्वी 50 % रक्कम म्हणुन विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद यांच्याकडे रक्कम रु.1,00,00,000/- जमा करण्यात आली असल्याने, उर्वरीत रक्कम रु.1,08,45,783/- मधुन जमिन विकास शुल्काची रक्कम व त्यावरील व्याज असे एकुण रक्कम रु.52,14,661/- वजा करुन उर्वरीत रक्कम रु.56,31,122/- विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद यांच्याकडे जमा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 46 :**

नगर भूमापन क्रमांक 5508 व 5509 मोहल्ला पैठणगेट, औरंगाबाद या मिळकती 15.00 मीटर रुंद विकास योजना रस्त्याने अंशतः बाधीत होत आहेत. बाधीत क्षेत्र अनुक्रमे 82.50 चौ.मी. व 91.50 चौ.मी. इतके असुन, रस्त्याने बाधीत क्षेत्र महानगरपालिकेने रस्ता रुंदीकरण मोहिम राबवित असतांना सन 2012 मध्ये ताब्यात घेऊन, रस्ता बांधकामाचे काम पुर्ण केलेले आहे.

उक्त मिळकतीचे मिळकतधारक श्री.अब्दुल करीम खान अब्दुल रहेमान खान व श्री.कमलाकर पंडीतराव मुंगीकर यांनी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे उक्त रस्त्याने बाधीत क्षेत्राचा मोबदला मिळणे बाबत रिट पिटीशन 805/2012 व 808/2012 अन्वये दावा दाखल केला. त्यामध्ये मा.उच्च न्यायालय यांनी सिध्द सिघ्र गणक दरानुसार बाधीत क्षेत्राचा मोबदला नियमानुसार तपासणी करुन चार आठवडयाच्या आत देण्यात यावा असे दिनांक 14/03/2012 रोजीच्या निर्णयामध्ये आदेशात केले. परंतू महानगरपालिकेतर्फे मिळकतीची मालकी एकापेक्षा जास्त जणांची असल्याने सदरचा मोबदला देणे शक्य झाले नाही. त्यामुळे संबंधीतांनी मा.उच्च न्यायालायाने अवमान याचिका 104/2015 व 130/2015 दाखल केल्या, त्यामध्ये महानगरपालिकेतर्फे बाधीत क्षेत्राचा मोबदला आठ आठवड्यात देण्यात येईल असे मा.न्यायालयाला अश्वासन देण्यात आले.

सन 2012 च्या सिध्द शिघ्र गणक दरानुसार बाधीत क्षेत्राच्या मोबदल्या करीता न.भू.क्र.5508 श्री.अब्दुल करीम खान अब्दुल रहेमान खान यांना रक्कम रु.25,74,123/- व न.भू.क्र.5509 श्री.कमलाकर पडीतराव मुंगीकर यांना रक्कम रु.28,54,800/- असे एकुण रक्कम रु.54,28,800/- मा.उच्च न्यायालयाचा अवमान होऊ नये म्हणुन चेक क्रमांक 285935 व 285936 दिनांक 22/12/2015 अन्वये मा.उच्च न्यायालयात जमा केली आहे. त्यास कार्योत्तर मान्यता होणेस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नगर भूमापन क्रमांक 5508 व 5509 मोहल्ला पैठणगेट, औरंगाबाद या मिळकती 15.00 मीटर रुंद विकास योजना रस्त्याने अंशतः बाधीत क्षेत्र अनुक्रमे 82.50 चौ.मी. व 91.50 चौ.मी. इतके असुन, रस्त्याने बाधीत क्षेत्र महानगरपालिकेने रस्ता रुंदीकरण मोहिम राबवित असतांना सन 2012 मध्ये ताब्यात घेऊन, रस्ता बांधकामाचे काम पुर्ण केलेले असल्याने, सन 2012 च्या सिध्द शिघ्र गणक दरानुसार बाधीत क्षेत्राच्या मोबदल्या करीता न.भू.क्र.5508 श्री.अब्दुल करीम खान अब्दुल रहेमान खान यांना रक्कम रु.25,74,123/- व न.भू.क्र.5509 श्री.कमलाकर पडीतराव मुंगीकर यांना रक्कम रु.28,54,800/-

असे एकुण रक्कम रु.54,28,800/- मा.उच्च न्यायालयाचा अवमान होऊ नये म्हणुन चेक क्रमांक 285935 व 285936 दिनांक 22/12/2015 अन्वये मा.उच्च न्यायालयात जमा केली असल्यामुळे, त्यास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 47 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.कृष्णा प्रभाकर पुराणिक, स्वच्छता निरीक्षक, (सद्यस्थितीत सेवानिवृत्त) वार्ड अ कार्यालय, यांनी महानगरपालिका सेवेत कार्यरत असतांना त्यांच्या स्वतःच्या Double Vessel Disease (हृदयाचे तीव्र आजार) या आजारावर उपचार केलेल्या वैद्यकीय खर्चाची सादर केलेली देयके एकुण रूपये 3,27,099/- सादर केले असून त्यापैकी अनुज्ञेय रक्कम रू.2,71,383/- च्या 90 टक्के रक्कम रू.2,44,245/- (अक्षरी रू.दोन लक्ष चौरेचाळीस हजार दोनशे पंचेचाळीस मात्र) त्यापैकी एकत्रित दाखल केलेल्या खर्च देयकाच्या 05 टक्के रक्कम रू.16,355/- (अक्षरी रू.सोळा हजार तीनशे पंचावन्न मात्र) मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.2,27,890/- (अक्षरी रू.दोन लक्ष सत्तावीस हजार आठशे नव्वद मात्र) एवढ्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येऊन त्यांनी यापूर्वी अग्रीम स्वरूपात घेतलेली रक्कम रू.1,50,000/- वजा जाता उर्वरीत रक्कम रू.77,890/- श्री.कृष्णा प्रभाकर पुराणिक यांना अदा करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.कृष्णा प्रभाकर पुराणिक, स्वच्छता निरीक्षक, (सद्यस्थितीत सेवानिवृत्त) वार्ड अ कार्यालय, यांनी महानगरपालिका सेवेत कार्यरत असतांना त्यांच्या स्वतःच्या Double Vessel Disease (हृदयाचे तीव्र आजार) या आजारावर उपचारार्थ केलेल्या वैद्यकीय खर्चाची सादर केलेली देयके एकुण रूपये 3,27,099/- त्यापैकी अनुज्ञेय रक्कम रू.2,71,383/- च्या 90 टक्के रक्कम रू.2,44,245/- (अक्षरी रू.दोन लक्ष चौरेचाळीस हजार दोनशे पंचेचाळीस मात्र) व एकत्रित दाखल केलेल्या खर्च देयकाच्या 05 टक्के रक्कम रू.16,355/- (अक्षरी रू.सोळा हजार तीनशे पंचावन्न मात्र) मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.2,27,890/- (अक्षरी रू.दोन लक्ष सत्तावीस हजार आठशे नव्वद मात्र) एवढ्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात येते. तसेच त्यांनी यापूर्वी अग्रीम स्वरूपात घेतलेली रक्कम रू.1,50,000/- वजा जाता उर्वरीत रक्कम रू.77,890/- श्री.कृष्णा प्रभाकर पुराणिक यांना अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्री.गजानन बारवाल :टि.व्ही.सेंटर येथील शॉपींग कॉम्प्लेक्सच्या बाबतीत जनतेकडून पैसे घेतलेले आहे. काम अद्यापही चालु झाले नाही. भार मनपावर पडू नये. इस्टीमेटही या बाबत जास्त पैसे लागल्यास जबाबदार कोण?

श्री.विकास एडके :या अगोदर मस्कट कन्स्ट्रक्शन नावाची कंपनी होती. आता सिद्दीकी नावाच्या कंपनीने काम घेतलेले आहे.

श्री.अफसर सिद्दीकी :सदरील काम हे नागरीकांकडून फंड गोळा करून करण्यात आलेला आहे.

कार्यकारी अभियंता :क्रीडा मैदानाच्या बाहेरीलशॉपींग कॉम्प्लेक्स बांधल्याचे काम हाती घेण्यात आले आहे. मस्कट कन्स्ट्रक्शनला काम देण्यात आले होते. क्रीडांगणासाठी सदरील जागा आरक्षीत ठेवलेली आहे. शॉपींग कॉम्प्लेक्सच्या बाबत सिडको कार्यालयाची ऑब्जेक्शन घेतले होते. काम थांबविण्यात आले होते. याबाबत Director Town Planning Pune, यांच्या सुनावणी झाली. निर्णय दिला. स्टेडिअमच्या बाहेरील जागे मध्ये कॉम्प्लेक्सला मंजुरी दिली. कॉस्ट वाढली. रिटेंडर करण्यात आले 3 निवीदा आल्या त्यामध्ये सिद्दीकी कंस्ट्रक्शनला काम देण्यात आले. मस्कट कन्स्ट्रक्शनने काम करण्यास असमर्थता दाखवली.

शहर अभियंता :यास कुणीच जबाबदार नाही. स्टेडीअमच्या बाबत नागरीकांनी सिडकोमध्ये तक्रारी केल्या होत्या. सुनावणी झाली. मा.आयुक्त साहेबांनी यामध्ये सकारात्मक भुमिका

मांडली. एनओसी मिळण्यासाठी 8 ते 9 महिने गेले. करारानुसार आतापर्यंत काम झ ाले असते असे मस्कट कंस्ट्रक्शन यांनी म्हटले. दर वाढलेले असल्यामुळे नविन दराने देण्यात यावे. असे त्यांचे म्हणने होते. ते प्रशासनास मान्य होते, त्यामुळे संचिका पूटअप करून फेरनिविदा करण्याबाबत निर्णय होऊन काम दिले आहे. यामध्ये मनपाचे नुकसान नाही. अंदाज पत्रकांपेक्षा कमी दराने निविदा आलेली आहे.

श्री.गजानन बारवाल :आतापर्यंत किती खर्च झाला?

का.अ.(सिद्दीकी) :83 लाख 85 हजाराचा आतापर्यंत खर्च झाला.

श्री.मनगटे गजानन :दुसऱ्याला काम दिलेले आहे. तर पहिल्या कन्स्ट्रक्शन कंपनीला काही आक्षेप नाही का?

का.अ.(सिद्दीकी) :नाही काही आक्षेप नाही.

श्री.मनगटे गजानन :विचार करण्याचा वेळ देण्यात यावा. पुढील सभेत प्रस्ताव घेण्यात यावा.

श्री.नितीन चित्ते :टी.डी.आर. संदर्भात प्रश्न आहे. जागेचा मोबदला पूर्वलक्षी उक्त क्षेत्रातील बांधीत जागेचा मोबदला टी.डी.आर. स्वरुपात देणे बाबत शासनाचे मार्गदर्शन अथवा परवानगी देणे बाबत विनंती केली असता अद्यापपर्यंत मार्गदर्शन अप्राप्त आहे. तसेच पान क्र.1 मध्ये नमुद केल्याप्रमाणे अवॉर्ड देण्यात आला. अवॉर्ड मंजुर केल्यानंतर रद्द करण्याचा अधिकार नगररचना विभागाला आहे का?

उपअभियंता (न.र.) :एखाद्या जागेचा अवॉर्ड पास झाला असेल अवॉर्ड रद्द करण्याचे अधिकार विभागीय आयुक्त यांना आहे.

श्री.नितीन चित्ते :अवॉर्ड रद्द न करता शासनाकडे टी.डी.आर. मागण्याचे कारणे काय?

उपअभियंता (न.र.) :2 कोटी 8 लाख रुपये टी.डी.आर. देता येत असेल तर ते वाचतील. शासनाने मार्गदर्शन दिले असते की, टी.डी.आर. देवू शकता आपण पूढील कार्यवाही केली असती. मा.उच्च न्यायालयात उवमान याचिका दाखल झाली. त्यावेळेस पैसे जमा करण्याचे आदेश दिले.

श्री.नितीन चित्ते :मा.उच्च न्यायालयाचे आदेश असतांना संबंधीतास पैसे देवू शकत नाही. अशी माहिती असतांना विभागीय आयुक्त/आयुक्त यांना का सांगण्यात आले नाही? आम्ही टी.डी.आर. देवू शकतो. विभागीय आयुक्तांची परवानगी नसतांना शासनास पत्र व्यवहार केला जातो. विधी सल्लागार यांचा यामध्ये सल्ला घेण्यात यावा. शासनाला पत्र पाठविण्याचे कारण काय?

मा.सभापती :शासनाकडून सुचना मिळाली असती तर अवॉर्ड रद्द करण्याची कार्यवाही केली असती. टी.डी.आर. देवू शकतो की नाही? याबाबत परवानगी मागितली.

श्री.नितीन चित्ते :अधिकार नसतांना शासनास परवानगी मागितली जाते.

मा.सभापती :याबाबत यापूढे संबंधीत अधिकारी यांनी दक्षता घेण्यात यावी.

श्री.नितीन चित्ते :मा.प्रधान सचिव यांना देण्यात असलेल्या पत्राची कॉपी सर्व 16 सदस्यांना देण्यात यावी.

मा.सभापती :सर्व स.सदस्यांना कॉपी देण्यात यावी.

याच बरोबर मा.सभापती यांनी सभा राष्ट्रगिताने संपन्न झाल्याचे घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद